RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 May 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 May, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : अकरावा | मे २०१६

अमृताचा फवारा (सत्संग) 5

प्रश्नोत्तरे 19

अमृतवेळ (संदेश) 29

निरोप संदेश (संदेश) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



अमृताचा फवारा

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू रामदासजी महाराजांची वाणी,
सुबाकोक्यु, कोलंबिया : ११ जून १९९५

परमपिता परमात्मा विश्वेश्वर सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार करतो ज्यांनी आपल्या आत्म्यावर कृपा करून आपले स्तुतिस्तोत्र गाण्याची संधी दिली. आपण सर्व येथे एकत्र बसलेलो आहोत हीदेखील त्यांचीच दया आहे.

आपल्या पुढे गुरू रामदासजी महाराजांची गुरूप्रेमाविषयी वाणी सादर केली जात आहे. संत–महात्मांनी रचलेली वाणी त्यांच्या पवित्र हृदयातून निघालेली असते. त्यातील एक–एक शब्द बहुमूल्य असतो ज्याची आपण कल्पनादेखील करू शकत नाही, कारण ती वाणी आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणते, आपले मन परिवर्तीत करते. अशी वाणी परमात्म्याचा संदेश देते. आपण विचार करून पहा आपण याचे काय मूल्य ठरवू शकतो?

सावन–सावन दुनिया कैहंदी, मैं ओहदी मस्तानी,
हसदा–हसदा दे गया मैंनूं, कृपाल अमर निशानी, (२)
सावन–सावन दुनिया कैहंदी .....

१. जद दासावन नज़री आया, पलकां विच लुकाया,
अजे तक ना भुल्ल ही सकेया, ज्यों सावन मुस्काया, (२)
सावन प्यारा, सावन सोहणा, (२) सावन दिलबर जानी,
हसदा हसदा ....

२. ओह सी इक नूरानी चेहरा, अक्खां विच समाया,
चोज़ निराले शान निराली, अजे समझ ना आया, (२)
नित ही रोवां नित ही गांवां, (२) लोग कहण दिवानी,
हसदा हसदा ....

३. चिट्टी दाढ़ी चौड़ा मत्था, पगड़ी बन्न सज आया,
परियां तक ओहनूं सजदे करदियां, चन वी अम्बर चढ़ आया, (२)
दुनियां ओहनूं बाहर लब्भदी, (२) दे गया किते झकानी,
हसदा हसदा ....

४. चलो नी सईयो सिरसे नूं चलिए, कृपाल ने होका लाया,
सावन दयालू ने रिमझिम लाई, 'अजायब' ने भी गाया, (२)
अओ सब ही दर्शन करीए, (२) ओह सूरत नूरानी,
हसदा हसदा ....

ती वेळ अत्यंत मंगलमय होती व ते जीव अत्यंत भाग्यवंत होते ज्यांना परमात्मा सावनजींच्या चरणी बसण्याची उत्तम संधी लाभली. जेव्हा महाराज सावन हसत असत तेव्हा असे जाणीव होत असे जणू काही त्यांचे संपूर्ण शरीरच हसत आहे. जसे आई आपल्या मुलांना छोटी-छोटी उदाहरणे देऊन समजावते त्याचप्रमाणे महाराज सावनना देखील अनेक उदाहरणे आठवत असत. ते आम्हांस प्रत्येक उदाहरण चुटकुल्यांच्या स्वरूपात सांगून परमार्थातील तत्वांचा अर्थालंकार समजावून सांगत असत. ती आपली खूप प्रेमळ दया होती ज्या दयेचा महिमा शब्दांत वर्णिला जाऊ शकत नाही.

ते आम्हांस हसत-हसत परमात्मा कृपालजींच्या रूपात अमर स्मृतिचिन्ह देऊन गेले. त्यांचे कपाळ रुंद होते, ते श्वेत पगडी परिधान करीत असत. ते अत्यंत जंटलमेन गुरू होते. ते कधीही आपल्या कपड्यांवर डाग लागू देत नसत. आपला महिमा मी कसा वर्णन करू? त्यांचे बाह्यदेहावरील कपडे जितके श्वेत होते ते अंतरात तितकेच स्वच्छ व निर्मळ होते. ते संगतला हे नेहमी सांगत की,''मला परका समजू नका, मी तुमचा स्वकीय आहे.''

प्रियजनहो, ते जेव्हा असे उद्‌गार काढीत असत, तेव्हा ते प्रेमळ शब्द हृदयास स्पर्श करून जात असत की त्या दीननाथांना आम्हां सर्वांप्रती किती

सहानूभुति आहे. त्यांचे असे उद्‌गार केवळ सांगण्यापुरतेच नव्हते, ते जितके बाह्यमुखी सांगत असत त्यांच्या अंतरात देखील तितकीच सहानूभुति होती.

परमार्थात देह धारण केलेल्या गुरूंची गरज यासाठी असते की पूर्णत्वास पोहोचलेले महात्मा नामाच्या साधनेद्वारे परमात्म्यास प्राप्त करून स्वत:च परमात्मारूप होऊन जातात. सर्व वेद–शास्त्र हेच सूचित करतात की पूर्णत्वास पोहोचलेले संत आणि परमात्म्यामध्ये काही फरक नसतो. शरीरात कैद केला गेलेला आत्मा परमात्म्यास तेव्हाच मिळू शकतो, जेव्हा स्वत: परमात्मारूप गुरू देह धारण करून आत्म्याची सुटका करण्यासाठी येतात.

जेव्हा कृपाळू परमात्म्याच्या दयेचा सागर उफाळून येतो तेव्हा तो स्वत: नर रूप धारण करून आत्म्याकडे येतो. परमात्मा आपल्या अनादी रूपात येऊन आपल्या अनादी रूपाच्या सहाय्याने आत्म्यास जागृत करतो. दररोज आपल्या दयावान दृष्टीने आत्म्याची अंतर्यातून मदत करतो आणि आत्म्यास त्याच्या स्वघरी पोहोचवितो, जेथून आत्मा आलेला असतो.

महात्मा रविदासांनी सांगितलेले आहे की, ''तुम्ही एकवेळ करवतीने आपले शरीर कापून घेणे स्वीकार करा परंतु पूर्णत्वास पोहोचलेले संत आणि परमात्मा यांमध्ये फरक आहे हे स्वीकार करू नका.'' पूर्णत्वास पोहोचलेल्या संतांची दृष्टी हंसाप्रमाणे असते. हंसात हे कौशल्य असते की तो दूध आणि पाण्यास वेगवेगळे करू शकतो. पूर्णत्वास पोहोचलेल्या संतांमध्ये विवेकबुद्धी असते, पूर्ण ज्ञान असते. महात्म्यांना नामाने लाभणारी शांती व नामाने मिळणाऱ्या सुखाची कल्पना असते. महात्म्यांस परमात्म्याच्या प्राप्तीचे ज्ञान असते तसेच विषय–विकारांच्या दुष्परिणामांचे देखील ज्ञान असते. महात्मा दोन्हीं गोष्टींना वेगवेगळे समजतात म्हणूनच ते आपणांस देखील विवेकबुद्धीद्वारे प्रेमाने समजावतात की,''प्रिय मुलांनो, विषय–विकारांपासून दूर रहा. विषय–विकारांचा रस प्राशन करू नका. आपल्या अंतरात परमात्म्याने अमृत ठेवलेले आहे त्या नामाच्या अमृताचे प्राशन करा.''

एका बाजुला आपणांस पूर्णत्वास पोहोचलेल्या संत–महात्म्यांच्या चरणी जाण्यास लाज वाटते व दुसऱ्या बाजुस आपण वेद–पुराणांचे पठण करण्यावर जास्त भर देतो, आपल्या मुला–बाळांना सोडून जंगलां–पर्वतांवर निघून जातो, प्राणायाम करू लागतो, आपल्या कानात छिद्रे पाडून घेतो. पूर्णत्वास पोहोचलेल्या संत संगतीच्या सुखाचे वर्णन आपली जिव्हा करू शकत नाही. आत्म्यास जी धुंदी येते त्याचेदेखील आपण वर्णन करू शकत नाही.

परमात्मा आपल्या अंतरात असून पूर्णत्वास पोहोचलेले संत–महात्मा आपणांस अंतर्यात जाण्याचे साधन व पद्धत सांगतात. महात्मा केवळ पद्धत सांगत नाहीत तर ते आपल्या अनादी स्वरूपाद्वारे आपली सदैव मदत करतात. पूर्णत्वास पोहोचलेले संत–महात्मा वरवरच्या दिखाव्याची भक्ती करीत नाहीत व आपल्या सेवकांना देखील वरवरच्या दिखाव्याची भक्ती करणे शिकवीत नाहीत. पूर्णत्वास पोहोचलेले महात्मा जाहिरातबाजी करीत नाहीत, ते कुणाची निंदाही करीत नाहीत व निंदा–चुगलीच्या मळाखाली दबलेही जात नाहीत.

जेव्हा परमात्मा कृपाल गंगानगरला आले तेव्हा तेथील व्यवस्थापक जाहिराती काढू लागले, शहरातील भिंतींवर मोठ–मोठे फोटो लावू लागले. महाराजांनी त्यावर नाराजी व्यक्त केली. आपले फोटो देखील काढून टाकण्यास सांगितले. ते म्हणाले, ''जर आपणांस हिरा मिळाला तर आपण तो किती लपवून ठेवतो. त्या हिऱ्याबद्दल आपल्या पत्नीस किंवा मुला–बाळांनाही सांगत नाही, त्यांच्यापासूनही तो गुप्त ठेवतो की यांनी उधळपट्टी करू नये. हिऱ्यांचे तर मूल्यांकन केले जाऊ शकते परंतु नाम हा एक अनमोल हिरा आहे.''

महाराज सावन सिंहजी ऐबटाबादला गेले जे सध्या पाकिस्थानात आहे. तेव्हा तेथे व्यवस्थापकांनी म्हटले की शहरात महाराजांच्या येण्याची घोषणा केली जावी. महाराजजी म्हणाले तुम्ही सत्संगाची व्यवस्था करा, घोषणा



करण्याची चिंता करू नका. थोड्यावेळानंतर विरोधक जीपवरती मोठे स्पीकर लावून प्रचार करू लागले की राधास्वामींचे गुरू आलेले आहेत, कोणीही त्यांच्याकडे जाऊ नये. त्यांच्या डोळ्यात जादू आहे, जो त्यांच्याकडे जातो तो त्यांचाच बनतो. ते विरोधक जेव्हा महाराजजींच्या घराखालून जात होते तेव्हा महाराजजींनी हसून म्हटले, ''काय बंधूंनो, तुम्ही म्हणत होता ती घोषणा केली जात आहे की नाही?''

आपण सांगता की संतांचे निंदकच त्यांचा प्रचार करतात. ज्याप्रमाणे चोर धनवानांच्या मागे लागलेले असतात त्याचप्रमाणे केवळ आजकालच नव्हे तर सदैव निंदक संत–महात्मांच्या मागे लागलेले असतात. त्यांना प्रसिद्धी देण्यात निंदकच हातभार लावतात. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

वडभागी गुरु संगत पावे, भागहीन भ्रम चोटां खावे।

परमात्म्याने त्याच्या दरबारी ज्याव्यक्तींच्या बाबतीत निर्णय केलेला असतो की यांना पूर्णत्वास पोहोचलेल्या महात्म्यांची संगत व सोबत लाभेल व यांच्या भाग्यात नाम लिहीलेले आहे, तर ते त्यागोष्टींपासून वंचित कसे काय राहू शकतील?

भागहीन गुरु ना मिले, निकट बठया नित पास।

जर भाग्यात नसेल तर मग जरी गुरू स्वत:हून त्याच्या घरी चालून आले किंवा त्याच्या घरातच त्यांनी जन्म जरी घेतला तरी आपणांस त्यांची ओळखच पटणार नाही की आपल्या घरी इतका मौल्यवान हिरा आहे.

जीव अंध आहे व परमात्मा डोळस व सुजाण आहे. परमात्मा ज्या व्यक्तीस सुजाण बनवू इच्छितो त्या अज्ञानी अंध जीवास तो सतगुरूंच्या शरणी पाठवितो आणि सतगुरू त्याच्या अंतरात नामाचा दीपक प्रज्वलीत करतात. त्याच्या अंतरात प्रकाश होतो जो अज्ञानतेच्या अंध:काराला दूर करून अंतर्यात बसलेल्या परमात्म्याचे दर्शन करतो.

अज्ञानी जीवास कल्पना नसते की तो भवसागर किती विशाल आहे? त्या भवसागरास पार करताना ऋषी–मुनी देखील थरथर कापू लागले. प्रियजनहो, तो भवसागर पार करण्याच्या भितीने ऋषि–मुनी जंगलात जाऊन उपाशी राहू लागले, त्यांचे शरीर वाळून अखेरीस त्यांच्या हाडांचा ढिग बनला. ही सतगुरूंची दयाच आहे की ते आपणांस नामाच्या जहाजात बसवून त्या भवसागरापार नेतात.

जे वडभाग होवह् वडभागी तां हर हर नाम ध्यावै।।

गुरू रामदासजी महाराज गुरूंचा महिमा वर्णन करीत सांगतात,''जर आपले भाग्य श्रेष्ठ असले तरच आपल्या हृदयात गुरू व नाम प्राप्त करण्याची इच्छा निर्माण होते. त्याहूनही आपले भाग्य श्रेष्ठ असले तर आपणांस नामाची साधना करण्याची आवड निर्माण होते.

नाम जपत नामे सुख पावै हर नामे नाम समावै।।

आता आपण प्रेमाने सांगता,''नामाचा जप केल्याने आपल्या अंतरात नाम प्रगट होते. नामात शांती आहे, सुख आहे आणि नामच आपल्या जन्म–मरणाचा चक्रनेमिक्रम नष्ट करते.''

सतगुरू आपणांस सांगतात की नामाची कमाई केल्यास त्यात सर्व साधनांचे फळ प्राप्त होते. जेव्हा आपण महात्मांनी दिलेल्या नामाचे स्मरण रात्रं–दिवस आपल्या जिव्हेद्वारे सतत चालूच ठेवले व आपण उठता–बसता, जागृत वा निद्रावस्थेत पावला–पावलांवर नामस्मरण करू लागलो तर त्यापेक्षा श्रेष्ठ अखंडपाठ दुसरा कोणता होऊ शकतो.

जेव्हा आपण नामस्मरणाद्वारे शरीराची नवद्वारे मोकळी करून नेत्रांच्या मागे पोहोचून सूर्य, चंद्र आणि तारकांना पार करून सतगुरू स्वरूपास अंतर्यात प्रगट करून घेतो तेव्हा आपण त्या मनमोहक स्वरूपास सदैव आपल्या सावलीप्रमाणे आपल्या सोबतच घेऊन फिरतो.

जेव्हा आपण अंतर्यात जाऊन ती आकाशवाणी रात्रंदिवस ऐकण्यात मग्न होतो व त्या वाणीचा रसाचे प्राशन करून विषय-विकारांचा स्वाद घेणे सोडून नामाचा रस पिऊ लागतो तर मग त्यापेक्षा मोठे वैराग्य दुसरे कोणते होऊ शकते? आपणांस ना घर-दार सोडावे लागते, ना मुला-बाळांचा त्याग करावा लागतो, ना जंगला-पर्वतांवर जावे लागते, ना शरीरावर भगवे कपडे परिधान करावे लागतात व ना कानास छिद्रे पाडून घ्यावी लागतात. गृहस्थी जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडत असता पहाटे उठून दोन-तीन तास ध्यान-अभ्यासासाठी काढून सतगुरूंच्या दयेने आपण आपल्या घरी पोहोचतो.

गुरुमुख भगति करो सद प्राणी।।

आता गुरू रामदासजी महाराज सांगतात,''तसे पाहिले तर जगातील सर्व जीव आप-आपल्या जागी भक्ती करण्यात मग्न आहेत. कोण मायेची भक्ती करतो, कोण मुला-बाळांची तर कोण देश-भक्ती करतो. परंतु या सर्व प्रकारच्या भक्ती आपणांस या जगात वारंवार घेऊन येतात. खरी भक्ती आपणांस आपल्या देहाच्या बंधनातून मुक्त करते. अशी भक्ती म्हणजे गुरू भक्ती होय.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

गुरु की भक्ति करे क्या प्राणी, ब्रह्मा, इन्द्र, महेश न जानी।

गुरूंची भक्ती काही सामान्य व किरकोळ पदार्थ नव्हे. ब्रम्हा जगाची निर्मिती करतो, विष्णू जगाचा पालनकर्ता आहे आणि महेश संहार करणारी शक्ती आहे, परंतु गुरूंची भक्ती त्यांच्या नशीबी देखील नव्हती. आपण मार्ग भटकलेले सांसारिक जीव गुरू भक्ती काय करू शकतो? जेव्हा कृपेचा सागर उफळून येतो तेव्हा तो स्वत:हून कोणत्या ना कोणत्या नर रूपात येऊन आपणांस त्याच्या भक्तीत गुंतवितो. ही तर परमात्मा कृपालजींचीच दया आहे की त्यांनी आपणांस शब्द-नामाच्या भक्तीत गुंतविले आहे.

हिरदै प्रगास होवै लिव लागै गुरमत हर हर नाम समाणी।।

आपण प्रेमाने सांगता की कोणतेही महात्मा आपणांस अंधविश्वासात गुरफटविण्यासाठी येत नाहीत. ते आपणांस अत्यंत प्रेमाने आपल्या कर्मांना अनुसरुन पहिल्या दिवशीच आपणांस ज्योत व नादाचा आंतरिक अनुभव देतात. शेकडो माणसे बसलेली असतात परंतु प्रत्येकास आप-आपल्या कर्मांनुसार अनुभव होतात. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''पती-पत्नीसही एकसमान आंतरिक अनुभव होत नाहीत.''

पूर्णत्वाला पोहोचलेले महात्मा आपल्या अंतरात नामाचा दिपक प्रज्वलीत करून अंधकार नष्ट करतात, आपण त्या प्रकाशात आपला आंतरिक प्रवास पूर्ण करतो. जी जमीन अगोदरच तयार असते त्यात केवळ बी पेरण्याचीच गरज असते, लवकरच हिरवेगार पीक तयार होते. परंतु जर जमीन तयार करावयाची असल्यास त्यात पीक येण्यास थोडा वेळ लागतो. त्याचप्रमाणे जे प्रेमी आत्मे असतात ते प्रेमळ हृदयाने येतात त्यांना चांगले आंतरिक अनुभव होतात. ते नाम घेऊन अंतर्यात लवकर प्रगती करतात. जे घरी जाऊन ध्यान-अभ्यास करीत नाहीत, आत्मनिरीक्षणाची डायरी लिहीत नाहीत, ज्यांच्या ध्यान-अभ्यासाचा नित्यनेम नसतो, ते जेव्हा गुरूंच्या संगतमध्ये येतात तेव्हा गुरू त्यांच्यावरही दया करतात.

मी ज्या दिवशी येथे आलो, त्या बैठकीत बहुतेक प्रेमींनी मला त्यांचे ध्यान-अभ्यासातील आंतरिक अनुभव सांगितले. ते ऐकून माझे हृदय खूप आनंदी झाले. कार्यक्रमा अखेरीस ते प्रेमी मला विचारू लागले की आम्ही जे अंतर्यात पाहिले ते खरे होते का? की ते आमच्या मनाने रचलेले भ्रम होते? पराजय तितका वाईट नसतो जितका पराजय स्वीकारणे वाईट असते. परमात्मारूप गुरू आपल्यावर किती दया करतात. गुरू दया करून अंतर्यात अनुभव करवितात परंतु आपले मन सर्व काही लूटून नेते की कदाचित हे चुकीचे तर नाही.

हीरा रतन जवेहर माणक बहु सागर भरपूर कीआ।।



गुरू रामदासजी महाराज प्रेमाने सांगतात,''आपला देह एक अत्यंत मोठा सागर आहे ज्याच्या तळाशी नामाचा हिरा आहे. आपण सतगुरूंच्या दयेने या प्रेमाच्या सागरात बुडी मारून त्या हिऱ्यास प्राप्त करू शकतो. हिरे–जडजवाहीरांचे मूल्यांकन केले जाऊ शकते परंतु नाम अनमोल हिरा आहे ज्याचे मूल्यांकन केले जाऊ शकत नाही.'' गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

घर रतन लाल बहु लादे, मन भरमेया लह ना सुखाइए।

जिस वडभाग होवै वड मस्तक तिन गुरमत कढ कढ लीआ।।
रतन जवेहर लाल हर नामा गुर काढ तली दिखलाया।।

सतांची वाणी अशा प्रकारे लिहीलेली असते की एका पंक्तित प्रश्न असतो तर पुढल्या पक्तित त्याचे उत्तर असते. आपण अगोदरच्या पंक्तित सांगितले की आपला देह एक सागर असून त्याच्या आत नामाचा हिरा आहे. आता आपण प्रेमाने सांगता,''मी ज्या रत्नाचा उल्लेख करीत आहे ते नामाचे रत्न आहे. ज्यांचे भाग्य उच्च असते ते सतगुरूंनी दिलेल्या उपदेशानुसार

जीवनाची वाटचाल करतात, संसारावरील प्रीत हळू–हळू कमी करतात, विषय–विकारांपासून मन वळवतात आणि मनाचे परिवर्तन करून अंतर्यात जातात. गुरू त्यांस हिरा देत म्हणतात की प्रिय शिष्या हा हिरा तुझा आहे.''

आपण मिस्टर ऑबेरॉयनीं लिहीलेल्या पुस्तकात भाई सुंदरदासाच्या महाराज कृपालजीं सोबत झालेल्या अनुभवांचे लेख वाचले असावेत. भाई सुंदरदास खूप अभ्यासू होता त्याची अंतर्यात खूप प्रगती होती. आम्ही दोघे सोबत ध्यान–अभ्यासात बसत असू. त्याने अंतर्यात सर्व संतांचे दर्शन केलेले होते. जेव्हा महाराज कृपालजींनी भाई सुंदरदासास विचारले,''हां बंधू अंतर्यातील गोष्टींचे वर्णन कर.'' त्याने सांगितले,''मी अंतर्यात सर्व संतांचे दर्शन केलेले आहे परंतु भीकाजी आणि शर्मदजींचे दर्शन केलेले नाही.'' महाराजजी म्हणाले,''ठिक आहे, तू आपले डोळे बंद करून ध्यानात बस.'' जेव्हा तो डोळे बंद करून ध्यानात बसला तेव्हा प्रिय कृपालजींनी त्यास शर्मद आणि भिकाजींचे दर्शन करविले. प्रियजनहो, ही एखादी काल्पनिक गोष्ट नव्हती, तो अंतर्यात जात असे व सत्य स्वत: पहात असे.

जे ध्यान–अभ्यासात बसत नाहीत, ते इतके सर्व पाहूनही असे म्हणतात की हा आमच्या मनाने रचलेला भ्रम तर नाही? जर आपण पाहू इच्छित असलो तर परमात्म्याचे प्रियजन आपणांस दाखविण्यासाठीच येतात, परंतु आपणांस पाहण्यासाठी आंतरिक नेत्र व तशाप्रकारचे हृदयही बनवावे लागते.

असेच एकदा महाराज सावन सिंहजी सतसंग करण्यासाठी भसोडा गावी गेले. तेथे पायघोळ अंगरखा घातलेला एक देवळातला पुजारी आला व म्हणाला तुम्ही साधू लोक उगाचच परमात्मा प्राप्तीविषयी बोलता, ना आजपर्यंत कोणी परमात्म्यास पाहिले आहे व ना परमात्म्यास दाखवू शकतील. महाराज सावन त्यास म्हणाले,''मी सत्संगही थांबवितो व भोजनही नंतर करेन, तू ये, मी परमात्मा दाखविण्यासाठीच आलेलो आहे.'' परंतु तो पुन्हा आला नाही, तो बिचारा कुठून इतके उच्च भाग्य आणणार?

याचप्रमाणे जेव्हा मी पहिल्या दौऱ्यावर वँकुवरला गेलो, तेथे शिख समाजातील एक प्रेमी आला व त्याने मला हाच प्रश्न विचारला, काय आपण परमात्मा पाहिला आहे? मी त्यास अत्यंत प्रेमाने म्हणालो,''मी स्वत:हून परमात्म्यास पाहू शकत नव्हतो परंतु मी आपल्या प्रिय सतगुरू कृपालजींच्या दयेने परमात्म्यास पाहिले आहे आणि इतरांस दाखवूही शकतो. मला माझ्या गुरूंची आज्ञा आहे, तू जेव्हा पाहिजे तेव्हा ये मी तुला परमात्मा दाखवू शकतो. परंतु खेदास्पद सांगावे लागते की मी अनेकदा तेथे जाऊन आलो पण मला तो मनुष्य पुन्हा दिसला नाही. असे जीव कोठून इतके उच्चप्रतीचे भाग्य आणू शकतात?

गुरू रामदासजी देखील हेच सांगतात, ''गुरूंना पाहणारा विशाल हृदय बनवून आला तर ते त्यास दाखवितात.'' मी नेहमी सांगतो की संतमत हे काही पऱ्यांच्या गोष्टींसारखे काल्पनिक नसून ते सत्यावर आधारीत आहे.

भागहीण मनमुख नहीं लीआ तृण ओलै लाख छपाया।।

आता गुरू रामदासजी महाराज सांगतात की जीव कोठून इतके उच्च भाग्य घेऊन येणार? परमात्मा पर्वताइतका विशाल आहे आणि तो मोह व अहंकाराच्या पडद्यामागे लपलेला आहे. मोह व मायेचा पडदा इतका जाडसर आहे की जोपर्यंत परमात्मा आपल्यावर दया करीत नाही आपण तोपर्यंत तो पडदा फाडून परमात्म्यास पाहू शकत नाही.

हे अशाप्रमाणे आहे की जसे गवताच्या किरकोळ काड्यांखाली लाखो रुपये दडलेले असले व आपण एक-एक कवडी मागत मरत असतो. जर कोणी ते किरकोळ गवताचे आवरण बाजूला सारून आपणांस त्या खजिन्याचा वारस बनविले तर विचार करून पहा, ते धन तर आपल्याकडे अगोदरही होते परंतु ते धन असूनही आपणांस काही फायदा झाला नाही. ज्याने आपणांस ते धन शोधून दिले आपण त्याचे आभार मानतो.

परमात्मा अगोदरही आपल्या अंतरात होता. तो असूनही आपण अनेक जन्म घेतले. कधी कीडे, कधी कुत्रे, कधी गाढव तर कधी हत्ती बनलो. आपण गुरूंचे आभार यासाठी मानतो की गुरूंनी आपणांस परमात्म्याशी आणि त्याच्या नादाशी व प्रकाशाशी जोडले.

मस्तक भाग होवै धुर लिखया तां सतगुरु सेवा लाए।।

गुरू रामदासजी महाराज सांगतात,''येथे येऊन परमात्म्याने एक नियम लागू केलेला आहे की जर उच्च भाग्य असेल तरच सतगुरू आपणांस त्यांच्या सेवेची, त्यांचे स्तुतिस्तोत्र गाण्याची संधी देतात आणि नाम देतात.

नानक रतन जवेहर पावै धन धन गुरमत हर पाए।।

आपण सांगता की सतगुरूंच्या सेवेचे हे फळ मिळते की आपल्याला नामाचे रत्न मिळते. सतगुरूंच्या दयेने परमात्म्यापासून विरह झालेल्या आपल्या आत्म्यास परमात्मा प्राप्त होतो. सतगुरू आपल्या अंतरात नामाचा दीपक प्रज्वलीत करून अज्ञानतेचा अंध:कार दूर करतात. आपण अशा सतगुरूंच्या चरणी त्यावेळीच जाऊ शकतो जेव्हा सृष्टीची निर्मिती करणारा ईश्वर दरबारी आपल्या नशिबात संतांचा संग लिहीतो तेव्हाच आपण त्यांच्या संगत–सोबतीत जाऊ शकतो. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

आपण लिए जे मिले, विछड़ को रोवन।

हे परमात्मा, आम्हांस या संसारात जन्म–मरणाच्या चक्रनेमिक्रमात फिरता–फिरता किती युगे लोटली हे माहित नाही. जर तुझी भेट घेणे हे आमच्या हातात असते, आमच्याकडे तुला प्राप्त करण्याचा अधिकार असता तर आम्ही तुझ्यापासून दूरावून रडत व तळमळत का राहिलो असतो?

आपणांसही परमात्मास्वरूप गुरूंचे आभार मानले पाहिजेत, ज्यांनी आपणांस आपल्या भक्तीचे दान दिले व भक्ती करण्याची संधी दिली.

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – २५ फेब्रुवारी १९९०

एक प्रेमी : *काल आपण सांगितले होते की नामदानाच्या वेळी प्रत्येक जीवाच्या संचित कर्मांचा संचय गुरू आपल्या ताब्यात घेऊन तो समाप्त करतात. मला असे वाटत होते की जस–जसे आपण ध्यान–अभ्यासात प्रगती करीत जातो, काही कर्मं अशी देखील असतात जी ध्यान–अभ्यास केल्यानंतर वरच्या मंडळांमध्ये जाऊन समाप्त करावी लागतात. काय ती निराळी कर्मं असतात का तो संचित कर्मांचाच एक भाग असतो?*

या व्यतिरिक्त मी हे जाणू इच्छितो की शिष्याचा संचित कर्मांचा हिशोब गुरू कसा समाप्त करतात? यासंदर्भात मला राजा जनकाची गोष्ट आठवते की ज्याप्रमाणे राजा जनक नरकात गेले होते आणि त्यांनी तीन वेळा नामाचे स्मरण करून सर्व आत्म्यांना मुक्त करविले होते. काय गुरू याच पद्धतीने संचित कर्मांचा संचय नष्ट करतात का त्यासाठी एखादी दुसरी पद्धत आहे?

बाबाजी : बंधूंनो, मला आनंद वाटतो की ही खूप खोलवर विचार करण्याची बाब असून ती प्रत्येकाच्या फायद्याची आहे. कदाचित असा प्रश्न इतर अनेक लोकांच्या डोक्यात आला असावा.

सर्वप्रथम ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे की जे सत्संगी अंतर्यात जातात त्यांना याविषयी सखोल माहिती असते. मी अनेकदा महाराज सावन सिंहजींच्या शिकवणीचा उल्लेख करतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''जग म्हणते की आम्ही स्वत: संतांकडे जातो, नामदान प्राप्त करतो, नामाची साधना करतो, परंतु जेव्हा ते अंतर्यात जातात तेव्हा स्वत: प्रत्यक्ष पहातात की आपण संतांकडे स्वत: जात होतो की संत आपल्याला स्वत:कडे आकर्षित करून नेत होते. ते जोपर्यंत अंतर्यातील वरच्या मंडळांमध्ये जात

नाहीत तोपेर्यंतच ते म्हणतात की आम्ही स्वत: ध्यान–अभ्यास करतो. जेव्हा ते उच्च आंतरिक मंडळांमध्ये जातात तेव्हा त्यांस उलघडा होतो की त्यांच्याकडून कोणीतरी ध्यान–अभ्यास करवून घेत होते. मग ते असे देखील म्हणतात की कोणीतरी मला पहाटे निद्रेतून जागृत करीत होते व कोणीतरी मला अंतरातून प्रेरणा देखील देत होते.''

मी हे देखील सांगतो की संत–सतगुरू नामदान देतेवेळी आपल्या अंतरात अशा प्रकारची व्यवस्था करतात की आपली काही कर्मं नष्ट होतात व आपण थोडीफार प्रगती देखील करीत रहातो. जीवनात आपल्या प्रारब्धात लिहिल्या गेलेल्या नशिबामुळे आपणांस काही अशा कर्मांना देखील सामोरे जावे लागते जी सुनिश्चित वेळी येऊन घडतात व ज्यांना सोसणे आपल्या सहनशक्ती पलिकडचे असते. ज्यावेळी आपण ध्यान–अभ्यास करीत असतो त्यावेळी आपण त्या घटनांना सामोरे जाण्याची तयारी करीत असतो की आपल्या आत्म्यात इतकी ताकद यावी आणि आपणांस त्या कर्मांना सहन करण्याची शक्ती मिळावी.

मी हे देखील सांगतो की जेव्हा प्रचंड जोरात वादळ येते तेव्हा मोठमोठे वृक्ष देखील जमीनीतून उखडले जातात. त्याचप्रमाणे जेव्हा कर्मांचा आवेश सुरू होतो आणि सुनिश्चित क्षणी घटना घडतात त्यावेळी आपण रडतो व दु:खी होतो. आपणांस माहितच आहे की ही कर्मं सोसणे आपल्या सहनशक्ती पलिकडचे असते. अशा वेळी जे प्रेमी नियमित ध्यान–अभ्यास करीत नसतात त्यांचा विश्वास डळमळतो व त्यांच्या अंतरात गुरूंप्रती रूक्षपणा निर्माण होतो. जे प्रेमी नामाची साधना करतात त्यांनादेखील त्रास तर होतो परंतु ते ही बाब समजतात व त्यांची कोणतीही तक्रार नसते की आमचे हे दु:खं दूर करावे उलट ते त्यास परमात्म्याची मर्जी मानून दृढप्रतिज्ञ रहातात. त्यांना माहीत असते की जितका त्रास होत आहे तितकी आपल्या कर्मांची सफाई होत आहे. हुजूर स्वामीजी महाराज सांगतात:

दुख की घड़ी गनीमत जानों, सुख में रहत सदा मन गाफिल।

दु:खाच्या घटकेला आनंदाचा क्षण माना कारण सुखांमध्ये मन गाफिल असते. दु:खाच्या घटकेला मन नरमलेले असते. जे अंतर्यात जातात ते सांगतात की त्याक्षणांचा फायदा घ्यावा व ध्यान–अभ्यास करावा. आपण विचार करून पहा की प्रत्येक सत्संगी व्यक्तीची विचारधारा तशी नसते. काही सत्संगी किरकोळ त्रास जरी झाला तरी घाबरून गुरूंपुढे प्रार्थना करू लागतात, आर्जव करू लागतात आणि जर त्यावेळी त्यांना मदत मिळाली नाही तर त्याचा विश्वास डळमळतो.

आपणांस हे सर्व अंतर्यात जाऊनच समजते की गुरू कशाप्रकारे दया करतात, गुरूंची दया करण्याची पद्धत कोणती असते आणि गुरू कशाप्रकारे आपली कर्मं नष्ट करतात? आपण जोपर्यंत बाह्यजगात बसलेलो असतो, थोडेफार ऐकून आपला विश्वासही बसतो, आपणांस धैर्य देखील मिळते व धाडसही मिळते. संत नेहमी यामुद्यावर जोर देतात की सत्य जाणून घेण्यासाठी आपण स्वत: अंतर्यात जाऊन पहा.

मी आपणांस नेहमी सांगत असतो की बाबा बिशनदासजींकडे दोन शब्दांचे नाम होते. त्यांनी खालच्या दोन्हीं मंडळांचा अनुभव घेतलेला होता. जेव्हा त्यांनी माझ्यावर दयादृष्टी टाकून मला त्या मंडळांचा अनुभव करविला तेव्हा सर्वप्रथम मला त्यांनी माझ्या पूर्वजन्माची माहिती दिली व सत्यची अनुभूती केली. त्यानंतर ज्या लोकांबरोबर माझ्या कर्मांनुसार माझे देणे–घेणे बाकी होते त्यांना देखील नेत्रांसमोर आणले व त्यांचे जितके देणे–घेणे बाकी होते त्याची देखील परतफेड केली.

ज्या आई–वडिलांनी माझे पालनपोषण केले होते त्यांच्याबद्दल बाबा बिशनदासजींच्या दयेने मला स्वत:लाच ज्ञान झाले की मला यांचे देणे किती काळापर्यंत द्यायचे आहे, यांनी माझे कोणते देणे बाकी आहे आणि मी यांच्याघरात का आलो आहे? मी घर सोडण्याच्या अनेक वर्षांपूर्वीच त्यांना

सांगितले होते की आपला व माझा संबंध किती काळापुरता आहे. नंतर मी परमात्म्याच्या स्मरणात लीन होणार आहे. जेव्हा इतके ज्ञान दुसऱ्या मंडळात पोहोचलेल्या व्यक्तीस होऊ शकते तर मग आपण विचार करून पहा आपणांस तर पूर्ण नाम व मार्ग लाभलेला आहे. आपणांस पूर्णत्वाला पोहोचलेले संत मिळालेले आहेत. जर आपण आळस न करता ध्यान-अभ्यास केला तर आपण स्वत: पाहू शकता, आपणांस ज्ञान होऊ शकते.

संत सतगुरू व अंतर्यात चांगली प्रगती करणारे सत्संगी संयम बाळगतात. त्यांच्याकडे पराकाष्ठेचा धीर आणि शिस्त असते. ते निसर्गाच्या नियमांविरूद्ध जाऊन कोणत्याही घटनेला घडण्यापासून रोखत नाहीत. इथून निघून जात असता एखादा अपघात जरी घडला तरी ते चमत्कार दाखवित नाहीत आणि आपल्या बाबतीत घडणाऱ्या अशा घटनेस रोखण्यासाठीदेखील ते काही करीत नाहीत. निसर्गाच्या नियमानुसार जी घटना घडते त्याचा ते अगदी सहजपणे स्वीकार करतात.

शब्द-नामाची कमाई करणारा सेंसी नामक एक मागास वर्गीय गृहस्थ महाराज सावन सिंहजींचा नामधारी होता. त्याची पत्नी खूप भांडखोर होती. ती त्यास खूप त्रास देत असे. ती त्यास ध्यान-अभ्यासात बसू देत नसे. कधी कधी तर त्यास दांडक्याने मारतही असे. त्याने एकदा बाबा सावन सिंहजींशी बोलता बोलता याविषयावर विचारले. जर एखाद्या सेवकाने नामाची कमाई करून संतांकडे अध्यात्माविषयी प्रश्न विचारला तर संत कृपेच्या तरंगात कधी कधी सेवकावर दया करून काही गोष्टींचा खुलासा करतात, इशारादेखील देतात.

महाराज सावन त्यास म्हणाले,''हे बघ प्रिय शिष्या, तू गेल्याजन्मी कावळा होतास आणि ही गाढवाच्या योनीत होती. तू इथे-तिथे झाडांवर उडत असायचास व ही धोब्याकडे ओझे वाहायची. हिच्या पाठीवर जखम झालेली होती. तू स्वाद घेण्यासाठी हिच्या जखमेवर चोच मारून पुन्हा

झाडावर जाऊन बसत असे. कर्मांचे देणे–घेणे तर सर्वांनाच चुकते करावे लागते. म्हणून या जन्मी ती तुझी पत्नी व तू तिचा पती बनलेला आहेस. प्रिय शिष्या, याजन्मातच तुमच्या कर्मांच्या हिशोबाची परतफेड झालेली बरी.

मी साधारणत: पंधरा वर्षांपूर्वी काही दिवसांसाठी संघरीया गावी राहिलो होतो. हा प्रेमी तेथे रहात असे व त्यास दुसऱ्या ठिकाणी मुक्कामासाठी स्थलांतर करावयाचे होते. त्याच्या पत्नीने त्यास दांडक्याने खूप झोडले व त्यानंतर तिने तो दांडका त्याच्या तोंडातही घातला. मी बरेचसे दृष्य पाहिले व अखेरीस मी तेथेच बसलो.

जेव्हा ते तेथून निघू लागले तेव्हा मी त्यांच्या मागोमाग निघालो. परंतु मी त्यांना यागोष्टीची जाणीव होऊ दिली नाही की मी त्यांच्या मागोमाग का येत आहे. मी एक किलोमीटर अंतर त्यांच्या मागोमाग चालत राहिलो. शेवटी त्यांना वाटू लागले की हा मनुष्य आमचा पाठलाग का करीत आहे? त्यांनी मला विचारले,''तुम्ही आमच्या मागे का येत आहात? आम्हांस काय विचारू इच्छिता? तुम्हाला आमची चौकशी करायची आहे? मी म्हटले, ''प्रिय बंधूंनो, मी पाहिले की ही तुला इतका अमानविय त्रास देत असूनही तू बिल्कुल बोलत नाहीस! ही तुझ्या तोंडात दांडका घुसवित होती, जर तू आपले तोंड उघडले असतेस तर कदाचित तुझा गळाच फाटला असता!'' त्या दोघांनी मला बसविले व म्हटले की तुम्ही समंजस आहात, बसा.

त्याने सांगितले की चाळीस वर्षांपूर्वी आम्हांस महाराज सावन सिंहजींकडून नामदान मिळाले होते. मी महाराज सावनजींपुढे आपल्या दुर्दशेचे विवरण केले होते. तेव्हा त्यांनी आम्हास ही गोष्ट सांगितली होती. माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. मी अशाच तऱ्हेने आपला ध्यान–अभ्यास करतो. मी मद्य–मांसाचे सेवन करीत नाही. माझी ही परिस्थिती आजची नाही. रोजच काही ना काही असे कृत्य चालूच असते. दुसऱ्या किंवा तीसऱ्या दिवशी तर नक्कीच घडते. मी तर त्या कर्मांचे फळ सहृदयी भोगत आहे.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की जे अंतर्यात जातात ते या सत्यास जाणतात की कुटुंब आणि मित्र–मंडळी आपणांस आपल्या पूर्वजन्मीच्या कर्मांनुसार मिळतात. ज्यांच्याशी आपली पूर्वकर्मांचे देणे–घेणे चांगले असते त्यांच्याशी आपले स्नेहसंबंध असतात आणि ज्यांच्याशी आपल्या पूर्वकर्मांचे देणे–घेणे तणावपूर्ण असते त्याच्याशी जरूर आपले संबंध वाकडे असतात.

आपण मिस्टर ऑबेरॉयनीं लिहीलेल्या पुस्तकात भाई सुंदरदासाची गोष्ट तुम्ही वाचली असावी. भाई सुंदरदास माझ्यासोबत वीस वर्षे राहिला. तो महाराज सावनजींचा अतिप्रिय शिष्य होता. त्याने अनेक वर्षे महाराज सावन सिंहजींकडे राहून सेवा केली होती. एके दिवशी महाराज सावनजींनी दयेच्या तरंगात येऊन त्यास सांगितले होते की, ''सुंदरदास, तुझी पत्नी संसार सोडून जाईल, तुझा तरुण मुलगा व मुलगी देखील संसार सोडून निघून जातील. त्या घटनेमुळे तुला धक्का बसून तू वेडसर बनशील. त्या स्थितीत तुझ्या हातून हत्या होईल. त्यासाठी तुला वीस वर्षांचा तुरूंगवास होईल. परंतु तू तुरूंगात केवळ सहा वर्षेच सजा भोगशील, मी तुझा सांभाळ करेन.''

महाराज सावनजींनी सुंदरदासाला ही गोष्ट घडण्यापूर्वीच सांगितली होती. त्यावेळी सुंदरदासाचे लग्न सुद्धा झाले नव्हते. सुंदरदास लग्न करू इच्छित नव्हता कारण त्यास त्या घटनेचे ज्ञान होते. सुंदरदास सांगत असे की मी महाराज सावनजींना हसून सांगितले होते की,''मी लग्नच करणार नाही, मग माझ्यावर अशी परिस्थिती येईलच कशी?''

वेळ आल्यावर अशी स्थिती निर्माण झाली की त्याच्या कुटुंबियांनी हट्ट धरत म्हटले तू लग्न कर नाहीतर आम्ही पाचही कुटुंबिय विहिरीत उडी मारून आपले प्राण देऊ, म्हणून त्याला लग्न करावे लागले. त्यानंतर सर्व घटना महाराज सावनजींनी सांगितल्याप्रमाणे घडल्या. तरीही तो जराही डळमळला नाही. त्याने त्या घटनेस परमात्म्याची मर्जी मानून तिचा आनंदाने स्वीकार केला. त्याला शेवटपर्यंत त्या घटनेचे ज्ञान होते.

सुंदरदासाचे फरीदकोटच्या राजाशी चांगले मैत्री–संबंध होते. राजास कल्पना होती की सुंदरदासाच्या घरात खूप काही अभद्र घटना घडल्या कारणाने त्याच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे. सुंदरदासाने न्यायाधीशास सांगितले की,''मी खून केलेला आहे तर मग मला सजा का देत नाही?'' सुंदरदासाने न्यायाधीशास सांगितले की,''माझ्या गुरूदेवांनी मला सांगितले आहे की मला वीस वर्षांची सजा सुनावली जाईल, परंतु मला सहा वर्षेच सजा भोगावी लागेल.''

जेव्हा हिंदुस्थान स्वतंत्र झाला तेव्हा वीस वर्षांची सजा भोगत असलेल्या कैद्यांना माफी देऊन त्यांची सुटका केली गेली होती. त्यावेळी सुंदरदासाची सहा वर्षांची सजा पूर्ण झाली होती. जेव्हा तो तुरुंगातून बाहेर आला तेव्हा मी स्वत: पाहिलेल्या त्याच्या स्थितीचे वर्णन त्या पुस्तकात केलेले आहे.

सुंदरदासने खूप ध्यान–अभ्यास केलेला होता. तो माझ्यासोबत ध्यान–अभ्यास करीत असे. एके दिवशी आम्ही ध्यानात बसलो असता त्याच्या पायावर जळते लाकूड पडून त्याचा पाय संपूर्ण भाजला होता. त्यावेळी आमची ध्यानाची आठ–आठ तासांची बैठक असायची. त्यादिवशी त्याने ध्यान–अभ्यासातून उठताक्षणी म्हटले,''आज ध्यान–अभ्यासात जितका रस आला तितका रस आजपर्यंत आयुष्यभरात कधी आला नाही.'' त्यास खूप वेदना होत होत्या. त्या पुस्तकात सुंदरदासाची मुलाखत वर्णन केली गेलेली आहे ज्यामध्ये सुंदरदासाने हुजूर कृपालजींसमोर आपल्या आंतरिक दृष्टांतांचे वर्णन केलेले आहे.

मी प्रेमींना संतबानी मासिक वाचण्याचा सल्ला देतो. मासिकात अशी अनेक प्रश्नोत्तरे व सत्संग छापले जातात. मी जेव्हा गेल्या विश्वदौऱ्यावर अमेरिकेतील संतबानी आश्रमात गेलो असता थोडे–थोडे करून मी आंतरिक मंडळांविषयी बऱ्याचशा गोष्टींचे वर्णन केले होते की आपण गुरूंच्या दयेखेरीज सत्संगात जाऊ शकत नाही, नाम प्राप्त करू शकत नाही.

गुरू आपल्या सोबत असतात. गुरू नामदान देत असता आपल्या अशा सर्व कर्मांचा नाश करतात ज्या कर्मांमुळे आपणांस अंतर्यात जाण्यात अडथळा येतो, त्यामुळे आपण आंतरिक प्रगती देखील करू लागतो. जेव्हा आपण आपले ध्यान तीसऱ्या तिळावर एकाग्र करतो तेव्हा ज्या गुरूंनी आपल्याला नाम दिलेले असते ते आपण पोहोचण्यापूर्वीच तेथे उभे असतात. आपण जस–जसे वरच्या मंडळांत जातो तस–तसे गुरू आपल्या आत्म्यावरील कर्मांचे ओझे कमी करू लागतात.

मी हे देखील सांगितले होते की जास्त काळ त्रिकुटीत राहून ध्यान–अभ्यास करावा लागतो. तेथे संचित कर्मांची पुंजी जमा केलेली असते. तेथे आपला आत्मा स्वच्छ होतो. ज्याप्रमाणे थ्रेशरमध्ये गव्हाचे पीक घातल्यावर गव्हाचे दाणे एका बाजूस तर कोंढा दुसऱ्या बाजूस आपोआप काढला जातो त्याचप्रमाणे त्रिकुटीत वाईट कर्मांचे ओझे आत्म्यावरून काढून टाकले जाते व आपला आत्मा वर कारण मंडळात पोहोचतो.

आपण आंतरिक मंडळांपासून अपरिचित असतो. जर सतगुरू सोबत नसतील तर आपण अंतर्यात जाऊच शकत नाही. ही सांगता येण्यासारखी गोष्ट नाही, ती अवर्णनिय आहे. आपण जस–जसे सूक्ष्म–महासूक्ष्ममधील वरच्या मंडळांमध्ये जातो, तेव्हा हे सर्व आपण स्वत:च्या डोळ्यांनी पहात जातो. सुरवातीला आपला आत्मा सच्चखंडातून आला होता. जोपर्यंत आपला आत्मा सच्चखंडात पुन्हा पोहोचत नाही तोपर्यंत संत आपला साथ सोडत नाहीत. तेथे संत आपल्या आत्म्यास परमात्म्यासमोर उभे करून त्यास हिच विनंती करतात की,''हा आपलाच जीवात्मा आहे. हा मार्गावरून दूरावला होता, तो आपल्याकडे माफी मागण्यासाठी आलेला आहे.''

स्वामीजी महाराजांनी सांगितले होते की जर आपणांस जिवंतपणीच अंतर्यात जाण्याची इच्छा असेल, स्वत: आंतरिक दृष्य पाहण्याची इच्छा

असेल व या गुढप्रश्नाचे निराकरण करण्याची इच्छा असेल तर तुम्ही बहादुर आहात, परंतु अंतर्यात जाण्यासाठी सर्वप्रथम गुरूंची दया प्राप्त करा. आज संगतमध्ये आप–आपल्या अध्यात्मिक कमाईला अनुसरून आपल्या अंतरात गुरूंवर विश्वास व श्रद्धा आहे. ज्यांची कमाई जास्त आहे त्यांची जास्त श्रद्धा बनलेली आहे कारण त्यांस थोडाफार सत्याचा दृष्टांत होत आहे. ते सच्चखंडात पोहोचल्यावर सतगुरूंचे ऋणी होतात, त्यांना सत्याचे ज्ञान होते. आपण जोपर्यंत बाह्यजगात बसलेलो आहोत तोपर्यंत मन कित्येकदा गुरूंप्रती व अध्यात्म मार्गाप्रती अभाव निर्माण करते आणि मनात रूक्षपणा निर्माण होतो.

प्रियजनहो, सर्व संत हेच सांगून गेले आहेत की हा संसार कर्मभूमी आहे. हे शरीर आपणांस कर्मांची परतफेड करण्यासाठीच मिळते. आपण या शरीरात बसून आपल्या चांगल्या व वाईट कर्मांची परतफेड करीत आहोत. भगवत गीतेत कृष्णाने अर्जुनास सांगितले होते की आपल्या आत्म्यास देहाच्या बंधनातून ना वाईट कर्मं मुक्त करू शकतात आणि ना चांगली कर्मं मुक्त करू शकतात. वाईट कर्मांस लोखंडाच्या बेड्या तसेच चांगल्या कर्मांस सोन्याच्या बेड्या असे संबोधले गेले आहे. बेड्या शेवटी बेड्याच असतात. मुक्ती नामात आहे. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

दद्दा दोष ना दिजे काहूँ, दोष कर्मां आपणयाँ।
जो मैं कीता सो मैं पाया, दोष ना दीजै अवर जना।।

संतांनी दर्शविलेल्या मार्गावर श्रद्धेने व प्रेमाने चालणे तसेच त्यांनी सांगितलेल्या पद्धतीनुसार शब्द–नामाची कमाई करणे आपले कर्तव्य आहे. आपणांस अंतर्यात जाणे जरूरी आहे ज्यामुळे आपली या कर्मांच्या कैदेतून जिवंतपणीच सुटका होईल आणि आपण सतगुरूंची प्रसन्नता प्राप्त करू शकू.

***



अमृतवेळ

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी प्रेमींना ध्यान–अभ्यासात बसविण्यापूर्वी दिलेला संदेश – मुंबई – १९ जानेवारी १९८६

बंधूंनो, त्या दयाळू परमात्मारूप गुरूदेव कृपालजींनी आपल्यावर अपरंपार दया करून आपणांस त्यांच्या मधुर आठवणीत बसण्याची संधी दिली. हे खूप उत्तम व सुखप्रद दिवस व्यतीत झाले. ज्यावेळी आपण परमात्म्याच्या मधुर आठवणीत बसतो व परमात्माचे स्मरण करतो ते क्षण अत्यंत भाग्योदयाचे असतात. तेच दिवस व तेच श्वास आपल्या हिशोबात धरले जातात.

तुम्ही घरी बसून ध्यान–अभ्यास करा किंवा इथे बसून करा व कोणत्याही वेळी ध्यान–अभ्यास करा, मी आपणांस ध्यान–अभ्यासात बसविण्यापूर्वी जे काही सांगतो, त्यागोष्टी लक्षात ठेऊनच तुम्ही ध्यान–अभ्यासात बसा. तसे केले तर तुम्ही आपल्या मनावर जरूर विजय प्राप्त करू शकाल.

ध्यान–अभ्यासात बसण्यापूर्वी आपल्या मनास जबाब देऊन बसा की तू दिवसभरात जी काही कामं करतोस मी त्यात दखल देत नाही. आता आम्ही आपले महत्वाचे काम करू लागलो आहोत, तेव्हा तू देखील आमच्या कामात दखल देऊ नकोस. आपण आपल्या शिल्लक कामांची पडताळ करावयास हवी ज्यामुळे आपणांस ध्यान–अभ्यास करत असता मध्येच उठू लागू नये व तास, दोन तास, चार तास जितका वेळ आपण ध्यान–अभ्यासासाठी काढतो त्याचा आपण यथासांग लाभ घ्यावा.

आपला संपूर्ण दिवस सांसारिक कामं करण्यात व्यतीत होतो व आपण रात्र झोपून व्यर्थ गमावतो. आपणांस हिऱ्यासमान मनुष्यजन्म मिळालेला आहे. विषय–विकार कवड्यांसमान आहेत. सांसारिक कामं करणे हे एकप्रकारे कवड्या गोळा करण्यासमान असते कारण मृत्युपश्चात त्या सांसारिक गोष्टी आपल्या सोबत जाणार नाहीत. आपल्या सोबत जाणारी व जमा करण्यायोग्य



वस्तू म्हणजे शब्द–नामाची कमाई आहे. सत्संगी व्यक्तीस ध्यान–अभ्यासात बसले असता मनात कोणतीही कल्पना न करण्याची सवय लागली पाहिजे. आपण जी काही कल्पना करतो ती मनाने ध्यान–अभ्यासात केलेली दखल असते. मनास शांत करा, शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. ध्यान–अभ्यासास कधीही ओझे मानू नका, तो प्रेमाने व आदरभावाने करा. मनास बाह्यजगात भटकू देऊ नका, त्यास तीसऱ्या तिळावर एकाग्र करा. तीसरा तिळच आपल्या आंतरिक प्रवासाचे आरंभस्थान आहे, आपल्या घराचे प्रवेशद्वार आहे. जेव्हा आपण अंतर्यात जातो तेव्हा अपणांस पाच पवित्र नामांच्या महानतेचे आपोआपच ज्ञान होते. ती नामं त्या स्थानांच्या थोर धन्यांची नावं आहेत ज्या स्थानांना ध्यान–अभ्यास करताना आपल्या आत्म्याने पार करावयाचे असते. नामाचे स्मरण आपणांस सूर्य, चंद्र व तारकांना पार करवून गुरू स्वरूपापर्यंत पोहोचविते. त्यापुढील मंडळे आपणांस शब्द–नामाद्वारे पार करावी लागतात.

ज्या मनुष्यजन्मात आपण आहोत, काय त्या मनुष्यजन्माविषयी आपण विचार केला आहे की हा किती सुंदर व उत्तम आहे? आपण या देहास बाहेरून सजविण्यात व शृंगार करण्यातच सर्व वेळ वाया घालवितो. खेदास्पद सांगावे लागते की जरी परमात्मा आपल्या अंतरात आहे व आत्मा देखील आपल्या अंतरात आहे तरीही आपला आत्मा ना परमात्म्यास भेटला ना सौभाग्यवंत झाला. आता आपण प्रेमाने व आदरभावाने ध्यान–अभ्यासाची सुरुवात करा व या वेळेचा पुरेपूर फायदा घ्या.

***

निरोप संदेश

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे सत्संगाच्या कार्यक्रमा अखेरीस संगतसाठी एक खास संदेश

मी अनेक दिवसांपासून आपणा सर्वांसमोर आपल्या परमपिता कृपालजींचे गुणगान केले त्यांचा महिमा वर्णिला. मी अगोदर देखील सांगितले आहे की आपण जरी सर्व धरतीचा कागद बनविला, संपूर्ण समुद्राची शाई बनविली आणि सर्व वनस्पतीची लेखणी बनविली तरीदेखील आपण त्या महान परमपिता कृपालजींचा महिमा लिहू शकत नाही. त्यांचा महिमा जिव्हेनेदेखील वर्णिला जाऊ शकत नाही. तो केवळ आपण पाहून अनुभवू शकतो.

ते अत्यंत तेजस्वी होते, प्रकाशमय होते व अत्यंत चित्ताकर्षक होते. त्या चित्ताकर्षक गुरूंचे दर्शन करण्यासाठी संसारातील लोकांनी जंगल–पर्वत धुंडाळले, अन्नाचा त्याग करून कंदमूळांवर उपजिवीका केली तरीही त्या मनोहर गुरूंनी त्या लोकांना दर्शन दिले नाही. ज्या लोकांच्या हृदयात केवळ त्यांच्यासाठी जागा होती, प्रेम होते आणि त्यांना भेटण्याची तळमळ व उत्कंठा होती, त्यांना ते स्वत:हून त्यांच्या घरीच येऊन भेटले. ते दीन दयाळू होते, प्रेमाचा सागर होते. ते आपल्या दोन्ही हातांनी दयेच्या खजिन्याचे वाटप करीत असत व त्यांनी मोकळ्या हृदयाने ईश्वरी देणगी वाटली.

प्रश्न तर आपल्या मागण्याविषयीचा होता. ज्याचे जसे मागणे होते, ज्याचे जसे प्रेम होते त्यांनी त्याचप्रकारची देणगी दिली. मी आपणांस गेल्या कित्येक दिवसांपासून आपल्या पाच हाडवैरी डाकूंबद्दल सविस्तर व खुलासेवार समजावले आहे की कशाप्रकारे हे डाकू प्रत्येक मनुष्याच्या अंतरातून डंक मारून त्यास बेशुद्ध करून ठेवतात. कशाप्रकारे यांनी सकल जगास वेडेपिसे करून सोडलेले आहे व सर्वांमध्ये रोग पसरवलेला आहे. हे जीवास कशाप्रकारे चारित्रवान ब्रीदवाक्यांच्या अडोशाआड लालूच व लोभाच्या भ्रामक मृगजळात फसवितात व शेवटी मनुष्यास अज्ञानतेच्या खोल खड्यात पाडतात.



मी हे देखील सांगण्याचा प्रयत्न केला आहे की आपण सच्चखंडवासी गुरूंशी जितके जास्तीतजास्त प्रेम करू तेवढे कमी असते. गुरूंना आपल्या प्रेमाची गरज नसते. ते स्वत:च त्यांच्या गुरूंच्या प्रेमात निमग्न असतात. ज्या विषय–भोगांचा अंत दु:खदायक असतो त्या भोगांपासून दूर रहा आणि त्या विषय–भोगांनाच सुखकर समजू नका. अखेरीस ते भोग आपणांस दु:खांच्या जाळ्यातच अडकवतील. गुरू अर्जुनदेवजी महाराजांनी सांगितले आहे:

हे कामी नर्क विश्रामी, बहो जोनि भ्रमणावें।

कबीर साहेब सांगतात,''काम आणि नामाचे वैर आहे. ते दोघेही एका जागी एकत्र राहू शकत नाहीत, जसे अंधार आणि प्रकाश एकत्र राहू शकत नाहीत.''ज्या मंदिरात आपण आपल्या गुरूदेवांना बसवू इच्छितो त्या मंदिरास स्वच्छ व पवित्र ठेवा, त्यास विषय–विकारांनी मलिन करू नका. तेव्हाच सतगुरू आपल्या अंतरात स्थान ग्रहण करण्यास तयार होतील. जर आपली जागा स्वच्छ व निर्मळ असेल व आपण त्यांच्यासाठी जागा बनवून ठेवलेली असेल तर ते जरूर तेथे स्थानापन्न होतील.

कामभोगांचे असे असते जसे आगीत आपण जितकी जास्त लाकडे टाकली तितक्याच त्या आगीच्या जास्त मोठ्या ज्वाळा भडकून उठतील. आपण आपल्या मनास जितके जास्त मोकळे सोडाल, त्यास जितका जास्त या गोष्टींचा स्वाद द्याल तितक्या जास्त इच्छा मन आपल्या हृदयात निर्माण करेल.पवित्र जीवन व्यतीत करून ध्यान–अभ्यास करून आपण इतर कोणावर उपकार करीत नाही,उलट आपण स्वत:च्या आत्म्यावरच दया करीत असतो.

कामाग्नी नेहमी मनुष्यास अपमानित होण्यास कारणीभूत बनतो. सत्संगी व्यक्तीसाठी कामाग्नीपासून स्वत:चा बचाव करणे खूप महत्वाचे आहे. आपण या पाच हाडवैरी डाकूंपासून तेव्हाच स्वत:चा बचाव करू शकतो जेव्हा आपण नामस्मरणाद्वारे रोमारोमात विखुरलेल्या आत्म्याच्या धारांना तीसऱ्या तिळावर एकाग्र करतो. या डाकूंची स्थूलगाठ आपल्या नेत्रांमागे सूक्ष्म त्रिकुटी ब्रह्मस्थानात आहे. जर आपण आपल्या आत्म्यावरून स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशी तीनही आवरणे बाजूस सारून पारब्रह्मांत पोहोचलो तर तेथे या डाकूंचा नामनिर्देशदेखील नाही. मग आपण चुकूनही त्यांच्याकडे लक्ष देणार नाही.

मी आपणांस कित्येक दिवसांपासून समजावत आहे की ध्यान–अभ्यास का जरूरी आहे? या पाच डाकूंपासून स्वत:चा बचाव करणे का जरूरी आहे? पवित्र जीवन व्यतीत करण्याचे कोणते फायदे आहेत? आणि गुरुप्रेमामुळे आपणांस काय प्राप्त होते? मी आशा करतो की तुम्ही सर्वजण या गोष्टींवर अंमल करून आपले जीवन पवित्र बनवाल.

ज्या प्रेमींनी या कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले, तना–मना–धनाने सेवा केली त्यासर्वांचा मी आभारी आहे. सर्व बंधू–भगिनींनी खूप सेवा केली ज्यामुळे ध्यान–अभ्यास करणाऱ्या प्रेमींना खूप मदत मिळाली. सेवकास सेवा करून कधीही अहंकार करता कामा नये.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जर आपण सेवा वा दान करून ते इतरां पुढे जाहीर केले व म्हटले की हे मी केले आहे तर ते म्हणजे आपण स्वादिष्ट पुलाव बनवून त्यावर राख व माती घालण्या सारखे आहे.''

आपणा सर्वांना माहीत आहे की उद्या पहाटे तीन वाजता 'नामदान' होईल. उद्या काही प्रेमींच्या परतीची फ्लाइट आहे तेव्हा व्यवस्थापकांनी त्यांकडे पूर्ण लक्ष द्यावे ज्यामुळे त्यांना कोणताही त्रास होऊ नये व ते येथून प्रेम घेऊनच आपल्या घरी परत जावेत.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
दिल्ली व अहमदाबाद शहरातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने दिल्ली व अहमदाबाद शहरात सत्संगाचा कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित होत आहे.

दिल्ली : २० ते २२ मे २०१६

कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार,
(पीरागढ़ी चौक जवळ) नवी दिल्ली ११० ०८७
फोन – ९८१०२ १२१३८, ९८१०७ ९४५९७, ९८१८२ ०१९९९

अहमदाबाद : १ ते ३ जुलै २०१६

ईश्वर भवन, (कॉमर्स कॉलेज जवळ), नवरंगपुरा,
अहमदाबाद (गुजरात)
फोन – ९९९८९ ४६२३१, ९७२५० ०५७९४, ९६३८७ ५२०२०

***